# पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन

सहकारी बंधू आणि भगिनींनो🙏,

कर्मचारी संघटना म्हणजे एक ना धड भाराभर चिंध्या...
मित्रांनो आपण नोकरी करत असतांना आपली आर्थिक कुवत कशी बळकट होईल या कडे जाणीवपूर्वक लक्ष देत असतो.

आपणास मागील पे रिविजन होण्या आधीच्या काळात अगर राहण्याची व्यवस्था ओएनजीसी च्या कॉलोनी मध्ये होत नसेल तर अशा वेळी अस्तित्वात असलेली एक Self lease ही पद्धत जीच्या मुळे आपल्याला त्यातून आर्थिक सहूलत मिळायची. सदरहूमुळे घरभाडे भत्ता(HRA) च्या पेक्षा जास्त प्रमाणात त्याचा फायदा होत होता.

मान्यताप्राप्त कर्मचारी संघटनाकृत कामगार विरोधी धोरणामुळे कामगार वर्गास वाईट अशी परिस्थती निर्माण झाली त्यामध्ये self lease ही पद्धत सुद्धा कोलमडून टाकण्यात आली. मागील पे रिविजनच्या वेळी सदर Self Lease पद्धत बंद करण्यात आली सोबतच त्यावरील टॅक्स आणि 10% HRR अशी रक्कम कपात करण्यात आली.

कर्मचारी संघटना कामगार हितामध्ये कधीच सरशी ठरत नाही. कर्मचारी संघटने कडून कामगारांना कपात झालेल्या HRR ची रक्कम मिळवून घेऊ अशी पोकळ आश्वासनं देण्यात आली पण त्या दिशेने कर्मचारी संघटनेने वाटचाल केली नाही. Self Lease पद्धत बंद होणार आहे अशी माहिती कामगारांना मिळाली असती तर Self Lease धारक कामगारांनी सदरील पद्धत बंद करून भविष्यात होणारी कपात रक्कम वाचवली असती परंतु कर्मचारी संघटना तोंडात मूग ठेवून गप्प होती.

व्यवस्थापनाच्या बाजूने विचार करणारी मान्यताप्राप्त कर्मचारी संघटना सदैव नकारार्थी आणि कामगार विरोधीच ठरली आहे. आता विचार करण्याचा वेळ आला आहे की आपण मान्यताप्राप्त करून दिलेल्या कर्मचारी संघटनेचा पायउतार करून कामगार हिताकरिता अविरतपणे झटणारी पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियनला निवडून द्यायचे की नाही..

**Vote & Support: - Petroleum Employees Union (W.O.U.)**



**Symbol of Trust: RIG**